# प्रेसनोट

दि.१८/०८/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | पाथर्डी पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.८७५/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | राजेंद्र दादासाहेब कराळे, वय–४१ वर्षे, पद–बाहयस्त्रोत वायरमन, म.रा.वि.वि.कं. मर्यादीत करंजी कक्ष, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर रा.दगडवाडी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २५००/– रूपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांच्या आईच्या नावे मागेल त्याला सौर कृषी पंप योजने अंतर्गत सौर कृषी पंप मंजुर झाला आहे. त्यानंतर तक्रारदार यांच्या गावाकरीता नेमुन दिलेले कराळे वायरमन हे सौर कृषी पंप बसविण्याच्या ठिकाणी तक्रारदार यांचे शेतामध्ये आले व त्यांनी आल्यानंतर जागेची पाहणी केल्यानंतर त्यांच्याकडील मोबाईल मध्ये फोटो काढले व तक्रारदार यांना म्हणाले की, सौर कृषी पंपाचे ठिकाणी लाईटचा पोल आहे त्याकरीता तुमचा सौर कृषी पंप चा अर्ज नामंजुर होऊ शकतो. त्यामुळे सौर कृषी पंप मंजूर करायचा असल्यास ४०००/– रुपये दया असे म्हणून तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी कराळे वायरमन हे सौर कृषी पंपाचा अर्ज नामंजुर करण्याची धमकी देत असल्याने तक्रारदार यांनी नाईलाजास्तव त्यांना दोन हजार रुपये दिले होते. त्यानंतर कराळे वायरमन यांनी तक्रारदार यांना उरलेले २०००/– सौर कृषी पंप बसवल्यानंतर दे असे सांगितले व सर्व्हे पुर्ण करुन शेतातून निघून गेले. त्यानंतर तक्रारदार यांचे शेतामध्ये सौर कृषी पंप बसविण्याचे काम पूर्ण झाले. कराळे वायरमन हे तक्रारदार यांचे शेतात कृषी सौर पंप बसविण्याच्या ठिकाणी सर्व्हे पुर्ण केल्याच्या मोबदल्यात २०००/– रुपये तसेच तक्रारदार यांचे राहते घराचे वीज मीटरला सिंगल फेजचे कनेक्शन जोडण्यासाठी ५००/– रुपये असे एकुण २५००/– रुपये लाच मागणी करत असले बाबतची तक्रार ला.प्र.वि. अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती. सदर तक्रारीप्रमाणे दि.१७/०८/२०२५ रोजी आरोपी राजेंद्र दादासाहेब कराळे यांचेविरुध्द लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी कराळे यांनी तक्रारदार यांचे शेतात कृषी सौर पंप बसविण्याच्या ठिकाणी सर्व्हे पुर्ण केल्याच्या मोबदल्यात २०००/– रुपये तसेच तक्रारदार यांचे राहते घराचे वीज मीटरला सिंगल फेजचे कनेक्शन जोडण्यासाठी ५००/– रुपये असे एकुण २५००/– रुपये लाचेची मागणी पंचांच्या समक्ष करुन लाच रक्कम स्वतः स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्याप्रमाणे आज दि.१७/०८/२०२५ रोजी सापळा कारवाई दरम्यान आरोपी राजेंद्र कराळे यांनी तक्रारदार यांचे कडून स्वतः २५००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in
ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :– १०६४
दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर